**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि.१४/०४/२०२६**

## मा.आयुक्त महोदयांनी केली क्षेपणभूमी व श्वान निर्बीजीकरण केंद्राची पाहणी ; घनकचरा विभागाच्या विविध यंत्रसामुग्री व वाहनांचीही केली पाहणी

शहरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) महोदयांनी दि.14 एप्रिल 2026 रोजी भोयदापाडा येथील क्षेपणभूमीची पाहणी केली. तसेच यावेळी वसई येथील श्वान निर्बीजीकरण केंद्रालाही मा.आयुक्त महोदयांनी भेट देऊन पाहणीदरम्यान संबंधित विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

मा.आयुक्त महोदयांकडून सुरुवातीस घनकचरा विभागाच्या विविध यंत्रसामुग्री व वाहनांचीही पाहणी करण्यात आली. यामध्ये स्वीपिंग मशीन, जेट मशीन, वॅक्यूम मशीन, स्प्रिंकल मशीन इ.चा समावेश होता. कचरा संकलन, वाहतूक व प्रक्रिया यासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची स्थिती, देखभाल व कार्यक्षमता याबाबत देखील सविस्तर आढावा घेण्यात आला. यंत्रसामुग्रीचा अधिक परिणामकारक वापर करून शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या सूचना मा. आयुक्तांनी दिल्या. तसेच शहरातील समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी घनकचरा विभागामार्फत वापरण्यात येणाऱ्या बीच क्लिनिंग मशीनच्या कार्याची मा. आयुक्त महोदयांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान समुद्रकिनाऱ्यावर साचणारा कचरा, प्लास्टिक, शंख-शिंपले व इतर घनकचऱ्याचे यांत्रिक पद्धतीने संकलन कसे केले जाते, वाळूमधील सूक्ष्म कचरा कसा वेगळा केला जातो याची सविस्तर माहिती घेण्यात आली. यावेळी बीच क्लिनिंग मशीनच्या ऑपरेटरांकडून प्रत्यक्ष कामाची माहिती घेण्यात आली तसेच कामकाज अधिक सुरळीत व परिणामकारक होण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविण्यात आल्या. स्वच्छ, सुरक्षित व पर्यावरणपूरक समुद्रकिनारे नागरिकांना उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे मा.आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले.

यानंतर मा.आयुक्त महोदयांनी वसई नवघर पूर्व येथील महानगरपालिकेच्या श्वान निर्बीजीकरण केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली. श्वान निर्बीजीकरण केंद्रात सुरू असलेल्या कार्यपद्धतीची पाहणी करताना, भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती घेण्यात आली. तसेच यामध्ये अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना संबंधितांना देण्यात आल्या.

तदनंतर मा.आयुक्त महोदयांनी भोयदापाडा येथील क्षेपणभूमीला भेट देत पाहणी केली. मा.आयुक्तांनी क्षेपणभूमीवर कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया व वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत तपशीलवार माहिती घेतली. तसेच कचऱ्याचे ढीग योग्य प्रकारे हाताळणे, दुर्गंधी व प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना राबविणे, आगीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक दक्षता बाळगणे याबाबत स्पष्ट सूचना मा.आयुक्त महोदयांनी संबधित अधिकारी व ठेकेदार यांना दिल्या. तसेच परिसरातील

नागरिकांच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये यासाठी पर्यावरणीय मानकांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला. मा. आयुक्तांनी उपस्थित अधिकाऱ्यांसोबतच क्षेपणभूमीवरील ठेकेदाराशीही संवाद साधत कामकाजातील त्रुटींबाबत स्पष्ट निर्देश दिले. कामाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी तसेच वेळेत व नियमांनुसार काम पूर्ण करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यास सांगितले. यंत्रसामुग्रीचा योग्य वापर, मनुष्यबळाचे नियोजन व नियमित देखरेख यावर विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले.

या पाहणी दौऱ्यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, उप-आयुक्त श्रीम.अर्चना दिवे, उप-आयुक्त श्रीम.हर्षला राणे, कार्यकारी अभियंता श्री.संजय कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त श्री.जितेंद्र नाईक तसेच स्वच्छता निरीक्षक, घनकचरा विभागाचे कर्मचारी, अभियंते उपस्थित होते.